# 'मेट्रो' दिनदर्शिका चित्रप्रदर्शन

**मुंबई :** मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या २०१९ दिनदर्शिकेमध्ये काही आकर्षक चित्रे सर्वसामान्य लोकांना पाहायला मिळणार आहेत. आगामी वर्षाची दिनदर्शिका सर्वोत्तम असावी यासाठी एमएमआरसीने 'मुंबई मेट्रो ३' च्या कामकाजाचा आढावा दर्शवणारी चित्रे या संकल्पनेअंतर्गत जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या विद्यार्थ्यांसह एमएमआरसीच्या मुख्य कार्यालयात १० डिसेंबरला चित्रप्रदर्शनी आयोजित केली होती. मुंबई मेट्रो ३ च्या सर्व पॅकेजची एकूण २० चित्रे या प्रदर्शनात पाहायला मिळाली. या कार्यक्रमाला एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्यासह अन्य मान्यवरांनी हजेरी लावली.